इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद

**<u>मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या न्यायाधिकारात</u>**

**<u>नागपूर खंडपीठ : नागपूर</u>**

**<u>रिट याचिका क्र. ३९३४/२०१९</u>**

शिक्षण प्रकाश मंडळाचे

लेफ्टनंट सुनील रामसिंह चुनावाले,

आयुर्वेद महाविद्यालय, चिखली,

पत्ता :दीनदयाल नगर, चिखली, तालुका: चिखली,

जिल्हा: बुलढाणा, ४४३२०१, मार्फत,

मुख्याध्यापक डॉ. श्रीकांत भाऊराव दारोकर,

वयः४५ वर्षे. **..... <u>याचिकाकर्ता</u>**

**----विरुद्ध ----**

१) युनियन ऑफ इंडिया

मार्फत सचिव, आयुष मंत्रालय, आयुष भवन,

"ब" ब्लॉक, जीपीओ कॉम्प्लेक्स, आय. एन. ए.,

नवी दिल्ली -११००२३.

२) सेंट्रल कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन,

भारतीय वैद्यकीय केंद्राचे परिषद अधिनियम १९७० कलम ३

अंतर्गत स्थापन केलेली सांविधिक संस्था,

मार्फत सचिव,

पत्ता: ६१-६५ इंस्टिट्युशनल एरिया, डी-ब्लॉकच्या समोर

जनकपुरी, नवी दिल्ली-११००५८.

३) महाराष्ट्र राज्य,

मार्फत सचिव,

वैद्यकीय शिक्षण आणि औषध विभाग,

मंत्रालय, मुंबई- ४० ०० ०१.

४) प्रवेश नियामक प्राधिकरण

आठवा मजला, न्यू एक्सलसियर बिल्डिंग ,

ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई-४० ०० ०१.

५) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक,

मार्फत निबंधक, कार्यालय: दिंडोरी रोड,

म्हसरूळ, नाशिक ४२२ ००४.

(न्यायालयाच्या दिनांक ०२.०३.२०२० रोजीच्या

आदेशाद्वारे उत्तरवादी क्र. ५ म्हणून समाविष्ट करण्यात आले) **..... <u>उत्तरवादी</u>**

---

श्री. आनंद जयस्वाल, वरिष्ठ वकील, यांच्यासमवेत श्री.एस.डी. चोपडे – याचिकाकर्त्यांचे वकील.

श्री.एन.देशपांडे, डेप्युटी सॉलिसिटर जेनरल ऑफ इंडिया (D.S.G.I.) उत्तरवादी क्रमांक १ साठी.

श्री. एन. सी. फडणीस, उत्तरवादी क्रमांक २ चे वकील.

श्री. ए. ए. माडीवाले, सहाय्यक सरकारी वकील उत्तरवादी क्रमांक. ३/ राज्य साठी.

श्री. एन. एस. खुबाळकर, उत्तरवादी क्रमांक ४ चे वकील.

श्री. अभिजीत देशपांडे, उत्तरवादी क्रमांक ५ चे वकील.

---

**<u>न्यायमंच:</u>** **<u>माननीय न्यायमूर्ति श्री. सुनील बी. शुक्रे आणि</u>**

**<u>माननीय न्यायमूर्ति श्रीमती. वृषाली. व्ही. जोशी</u>**

**दिनांकः 		०९. ०२. २०२३**

**मौखिक न्यायनिर्णय:** (द्वारा माननीय न्यायमूर्ति श्री. सुनील बी. शुक्रे.)

१. म्हणणे ऐकले.

२. **अधिनिर्णय** - अधिनिर्णय जारी करून त्यावर तात्काळ उत्तर मागविण्यात आले. संबंधित पक्षकारांच्या विद्वान वकिलांच्या संमतीने अंतिमतः युक्तिवाद ऐकण्यात आला .

३. २०१८-१९ या वर्षासाठी बी.ए.एम.एस. अभ्यासक्रम चालवण्यासाठी याचिकाकर्त्याला यापूर्वीच देण्यात आलेली परवानगी मागे घेण्याचा आक्षेपित आदेश हा केंद्र सरकारने नियुक्त केलेल्या निरीक्षकांच्या अहवालावर आधारित आहे, सेंट्रल कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन च्या नव्हे. भारतीय वैद्यक केंद्रीय परिषद अधिनियम, १९७० (थोडक्यात '१९७० चा अधिनियम') च्या कलम १९ आणि २० अंतर्गत, कोणत्याही वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय किंवा इतर संस्थेची तपासणी करण्यासाठी वैद्यकीय निरीक्षकांची नियुक्ती केवळ सेंट्रल कौन्सिल (केंद्रीय परिषद) करेल, केंद्र सरकार नाही किंवा भारतीय वैद्यकशास्त्रात शिक्षण दिले जात असलेल्या कोणत्याही महाविद्यालय, रुग्णालय किंवा इतर संस्थेची तपासणी करण्यासाठी आवश्यक वाटेल इतक्या अभ्यागतांची नियुक्ती करेल. १९७० च्या अधिनियमाच्या कलम २१ अंतर्गत, निरीक्षक किंवा अभ्यागतांनी सादर केलेल्या अहवालाच्या आधारे केंद्रीय परिषद योग्य कारवाई करू शकते आणि अशी कारवाई मान्यता मागे घेण्याची असू शकते.

४. सध्याच्या प्रकरणात, केंद्रीय परिषदेने कोणत्याही निरीक्षकांची नियुक्ती केली नव्हती किंवा सेंट्रल कौन्सिल ने (केंद्रीय परिषदेने) कोणत्याही अभ्यागतांची नियुक्ती केली नव्हती आणि त्यामुळे १९७० च्या अधिनियमाच्या कलम २१ अंतर्गत केंद्रीय परिषदेने त्यांच्या अधिकाराचा वापर करावा ह्यासाठी निरीक्षक किंवा अभ्यागतांनी कोणताही अहवाल सादर केला नव्हता. त्यामुळे, आक्षेपित आदेश कायद्याच्या नजरेत टिकू शकत नाही.

५. ह्यासारख्याच एका प्रकरणात, होमिओपॅथिक महाविद्यालयाशी संबंधित, **(२०१८) १७ एस.सी.सी. ७५३** मधील **टेम्पल ऑफ हॅनिमन होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटल विरुद्ध युनियन ऑफ इंडिया आणि इतर**ह्या प्रकरणात माननीय सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की, केंद्र सरकारने नियुक्त केलेल्या निरीक्षकांनी सादर केलेल्या अहवालाच्या आधारे मान्यता किंवा परवानगी मागे घेण्याचा कोणताही अधिकार वापरता येणार नाही. होमिओपॅथी केंद्रीय परिषद अधिनियम, १९७३ च्या कलम १७, १८ आणि १९ मध्ये (थोडक्यात "उक्त अधिनियम") केलेल्या समान तरतुदींचा विचार केल्यानंतर माननीय सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय दिलेला आहे. उक्त अधिनियमाच्या कलम १७, १८ आणि १९ मध्ये केलेल्या तरतुदी १९७० च्या अधिनियमाच्या कलम १९, २० आणि २१ मध्ये केलेल्या तरतुदींशी समान आहेत आणि म्हणूनच, हे नि:संशयपणे सांगितले जाऊ शकते की, **टेम्पल ऑफ हॅनिमन** (वर उल्लेखित) प्रकरणात, ह्या प्रकरणाची तथ्ये, गुणोत्तराने पूर्णपणे समाविष्ट आहेत.

६. परिणामी, आक्षेपित आदेश कायम ठेवला जाऊ शकत नाही, कारण तो कायदयाच्या दृष्टीने अयोग्य आहे आणि तो रद्दबातल करण्यास पात्र आहे.

७. या याचिकेतील प्रार्थनेमधील मुद्दे (अ) आणि (ब) ला मंजुरी देण्यात येते जे खालील प्रमाणे आहेत.

"(*अ) उत्तरवादी अधिकाऱ्यांच्या कार्यालयातून संबंधित नोंदी आणि कागदपत्रे मागवा आणि त्याची वैधता तपासल्यानंतर, उत्तरवादी क्रमांक १ ने दिनांक १५. ११. २०१८ रोजी दिलेला आदेश रददबातल ठरवावा आणि त्या उद्देशाने योग्य रिट आणि/किंवा आदेश जारी करावा (अॅनेक्स -एच).*

*(ब) याचिकाकर्त्याच्या महाविद्यालयातील बी.ए.एम.एस. अभ्यासक्रमात २०१८-२०१९ शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द आणि/किंवा बदली न करण्याचे निर्देश उत्तरवादी -प्रवेश नियामक प्राधिकरणाला देण्यात यावेत ."*

८.	वरील मुद्द्यांवर अधिनिर्णय कायम. खर्चा बाबत आदेश नाही.

**(न्या. श्रीमती. वृषाली. व्ही. जोशी)**		**(न्या. श्री. सुनील. बी. शुक्रे.)**

**<u>अस्वीकरण</u>**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल".